आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) छत्रपती संभाजीनगर

**School Leadership Academy, Maharashtra**

मोड्यूल क्रमांक ५५

# विद्यार्थ्यांच्या पटनोंदणी व नियमित उपस्थितीत यशस्वी शालेय नेतृत्वाचा अभ्यास

## A Study of Successful School Leadership in Student Enrollment and Regular Attendance



**प्रस्तावना** -

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे मुख्य उद्दिष्ट १००% पटनोंदणी १००% उपस्थिती व दर्जेदार शिक्षण हे होय. विदयार्थी शाळेत यावेत, टिकावेत आणि शिकावेत यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासून थोर विचारवंतांनी, समाजसुधारकांनी, शिक्षणतज्ञांनी आपले योगदान दिले आहे. देश आणि राज्य पातळीवरून यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यात जागतिक बँकेचे आर्थिक योगदान अधोरेखित करायला हवे.

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठीच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ लागू करण्यात आला. त्याचबरोबर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण NEP २०२० नुसार मुले शाळेमध्ये प्रवेश घेतील व नियमितपणे शाळेत उपस्थित राहतील याची खात्री करण्यावर भर दिला. शाळेची १००% पटनोंदणी व्हावी, १००% विद्यार्थी शाळेत नियमित उपस्थित राहावेत व त्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, याकरिता हा विषय शालेय नेतृत्वाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा ठरतो.

**मोड्युल अध्ययनाची उद्दिष्टे-**

१) शालेय नेतृत्वात पटनोंदणी व नियमित उपस्थितीची संकल्पना समजून घेणे.

२) पटनोंदणी व नियमित उपस्थितीत येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.

३) विद्यार्थ्यांच्या विकासात पटनोंदणी व नियमित उपस्थितीचे महत्त्व समजून घेणे.

४) पटनोंदणी व नियमित उपस्थितीत शालेय नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.

५) पटनोंदणी व नियमित उपस्थितीत यशस्वी नेतृत्वाचा अभ्यास करणे.

६) पटनोंदणी व नियमित उपस्थितीत यशस्वीरित्या काम करण्यासाठी शालेय नेतृत्वाचा योग्य दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करणे.

**पटनोंदणी व नियमित उपस्थिती संकल्पना** -

'**कुटुंब सर्वेक्षणातून ६ ते १४ वर्षे वयोगटातील दाखलपात्र मुलांना प्रवेश देण्यासाठी करावयाची नोंद म्हणजे पटनोंदणी होय.**' पटनोंदणी प्रत्येक वर्षी करावी लागते. पटनोंदणी साधारणपणे फेब्रुवारी - मार्च महिन्यात पूर्ण करावी लागते .वाडीवस्ती पासून ते महानगरपालिकेपर्यंत शक्य असेल त्या प्रमाणात शिक्षक संख्येनुसार प्रभाग पाडून पटनोंदणी केली जाते. कुटुंब सर्वेक्षण करताना गृहभेटीत बालकांच्या जन्मतारखेची नोंद करून घेतली जाते. सहा ते चौदा वर्षे वयोगटातील दाखलपात्र मुलांना शाळेत प्रवेश दिला जातो. पटनोंदणी करताना शिक्षकांना बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागतो. पालकांची शिक्षणाबाबत अनास्था असणे, आर्थिक अडचणी, पालकांची निरक्षरता,घर व शाळा यात अंतर जास्त असणे व कौटुंबिक संघर्ष इत्यादीमुळे १००% पटनोंदणी करताना अडचणी येतात, परंतु शाळा व्यवस्थापन समिती, सुशिक्षित पालक, स्वयंसेवक व समाज इत्यादींचे सहकार्य घेऊन १००% पटनोंदणीसाठी शिक्षक प्रयत्न करतात. दरवर्षी जून महिन्यात शाळा सुरू,झाल्यानंतर पटनोंदणी पंधरवाडा साजरा केला जातो. मुख्याध्यापक, शिक्षक व पालक यांच्या बैठका होतात, शाळा व्यवस्थापन समितीची बैठक होते, शाळा प्रवेश दिंडी काढली जाते, अतिशय प्रसन्न आनंदी वातावरणात प्रवेशोत्सव साजरा केला जातो. नवागतांचे स्वागत कल्पकतेने केले जाते. उदाहरणार्थ.. मिरवणुका काढणे, पुष्पगुच्छ, फुगे व चॉकलेट देणे. त्याच बरोबर महत्वाचे म्हणजे मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशाचे वाटप पहिल्या दिवशीच देणे. शालेय पोषण आहारात गोडधोड जेवणाचा समावेश करणे इ.

**उपस्थिती म्हणजे**, '**ज्या शाळेत विद्यार्थ्यांची नोंदणी केली जाते त्या शाळेत तो विद्यार्थी उपस्थित राहणे.**'

नियमित उपस्थिती ही बाब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. नियमित उपस्थितीची मुलांना सवय लावताना खूप अडचणी येतात. उदाहरणार्थ विद्यार्थी पूर्ण दिवस अनुपस्थित

असणे,दोन-चार किंवा त्यापेक्षा जास्त अनुपस्थित असणे, दुपारच्या सुट्टीत अनुपस्थित असणे, एखादा तास चुकवणे,शाळेत उशिरा येणे,इत्यादी प्रकारे विद्यार्थी शाळेतून अनुपस्थित राहतात. अशावेळी शिक्षकांनी गैरहजर राहणाऱ्या मुलांच्या कारणांचा शोध घेणे आवश्यक ठरते. याकरिता पालक सभा घेऊन पालकांचे प्रबोधन केले जाते .शाळेत मुले रममाण व्हावीत म्हणून रम्य व आनंदी परिसर ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.विविध उपक्रमांचे आयोजन व आनंददायी शिक्षण इत्यादीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती ठेवण्यासाठी मदत होते. विद्यार्थ्यांची पटनोंदणी व नियमित उपस्थित जितकी जास्त तितकी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला उपकृतच ठरते.

**विद्यार्थ्यांची १००% पटनोंदणी व नियमित उपस्थिती रहावी म्हणून पटनोंदणी व उपस्थितीची काही उद्दिष्टे खालील प्रमाणे -**

१) पटनोंदणी सर्वेक्षण मोहिमेची अंमलबजावणी प्रभावीपणे पार पाडणे.
२) मुख्याध्यापकांनी सर्वेक्षणाचे सूक्ष्म नियोजन करणे.
३) शाळेत उपलब्ध शिक्षकांवर सर्वेक्षणाची जबाबदारी सोपविणे.
४) पटनोंदणी पंधरवाडा साजरा करणे.
५) दाखलपात्र मुलांसाठी प्रवेशोत्सव साजरा करणे.
६) शाळेच्या पहिल्या दिवशी मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करणे.
७) शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेश वाटप करणे.
८) विद्यार्थी नियमित उपस्थितीसाठी शाळा व्यवस्थापन समितीचे सहकार्य घेणे.
९) विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थितीसाठी पालकांचे सहकार्य घेणे.
१०) विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थितीसाठी शिक्षकांचे सहकार्य घेणे.
११) विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थितीसाठी समाजाचे सहकार्य घेणे.
१२) शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करणे.
१३) शाळा व समाज संबंध जोपासणे.
१४) शाळेची विश्वासार्हता वाढविणे.
१५) शाळेचे पटनोंदणी वाढविण्यासाठी समाजाचा विश्वास संपादन करणे.
१६) शालेय वातावरण प्रसन्न आकर्षित व सुरक्षित ठेवणे.
१७) शाळेच्या भौतिक सुविधा वाढविण्यासाठी सीएसआरची मदत घेणे.

**पटनोंदणी व नियमित उपस्थितीत शालेय नेतृत्वासमोरील आव्हाने -**

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क 2009 नुसार प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आलेले आहे. या कायद्यानुसार शासन निर्णय 2018 अन्वये 6 ते 14 वर्षे वयोगटातील बालकांची १००% पटनोंदणी करणे करिता मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. पटनोंदणी वाढविण्याकरिता शाळेमध्ये विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याची जबाबदारी जेव्हा शाळेवर येऊन पडते तेव्हा शालेय नेतृत्वापुढे अपेक्षित शैक्षणिक यश प्राप्त होण्यासाठी अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते.

**शाळेशी संबंधित आव्हाने -**

1) शाळेला सहा ते चौदा वयोगटातील दाखल पात्र बालकांचा शोध घेण्यासाठी सर्वेक्षण पूर्ण करण्याचे आव्हान असते.

2) शाळेला १०० % पटनोंदणीचे उद्दिष्ट साध्य करण्याचे आव्हान असते.

3) शाळेला नियमित उपस्थिती टिकवून ठेवण्याचे आव्हान असते.

4) शाळेत 'गुढीपाडवा पट वाढवा' हा पट नोंदणीशी संबंधित उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे आव्हान असते.

5) शाळेत अपुरी शिक्षक संख्या असणे हे सुद्धा शाळेशी संबंधित एक आव्हानच असते.

**शिक्षकांशी संबंधित आव्हाने** :-

1) शिक्षकांमध्ये पटनोंदणी बाबत पालकांशी संवाद साधताना उदासिनता दिसून येते.

2) पटनोंदणी सर्वेक्षण पूर्ण करताना शिक्षकांचे दुर्लक्ष होते त्यामुळे शालेय नेतृत्वासमोर आव्हान उभे राहते.

3) विद्यार्थी गुणवत्ता विकास करताना नियमित उपस्थिती ठेवण्याचे आव्हान शालेय नेतृत्वापुढे असते.

4) विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास साधताना विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती ठेवण्याचे आव्हान असते.

5) शाळेतील दिव्यांग मुले शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षकांना प्रवृत्त करणे हे नेतृत्वापुढे आव्हान असते.

6) विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देण्यात शिक्षकांना अडचणी येतात तेव्हा जास्त पटसंख्या असल्याने शिक्षकांना येणाऱ्या अडचणी सोडविण्याचे आव्हान नेतृत्वापुढे असते.

7) स्वाध्याय तपासणीत शिक्षकांना अडचणी येतात त्या सोडविण्याचे आव्हान शालेय नेतृत्वाकडे असते.

8) वाढती पटसंख्या स्थिर ठेवण्यासाठी वेगळेपण जपण्यासाठी शिक्षकांना प्रयत्न करावा लागतो अशावेळी नेतृत्वासमोर आव्हान असते.

9) शिक्षकांना बऱ्याच वेळा वर्ग नियोजन करताना अडचणींना सामोरे जावे लागते अशावेळी शालेय नेतृत्वासमोर आव्हान उभे राहते.

10) शिक्षकांना ताणतणावाला सामोरे जावे लागते हे शालेय नेतृत्वाकडे आव्हान असते.

11) वाढत्या पटसंख्येमुळे गुणवत्ता टिकवण्यासाठी सतत अपडेट लागत असल्याने शालेय नेतृत्वाकडे आव्हान असते.

12) स्पर्धात्मक वातावरणाचा ताण शिक्षकांना होणे हे देखील शालेय नेतृत्वाचे एक आव्हान असते.

13) वर्ग पटसंख्या जास्त असल्यामुळे वर्ग नियंत्रण करताना होणारा घशाचा त्रास देखील शालेय नेतृत्वापुढे आव्हान निर्माण करते.

**विद्यार्थ्यांशी संबंधित आव्हाने** -

1) विद्यार्थ्यांच्या वर्तन समस्या निर्माण होतात यावेळी शालेय नेतृत्वासमोर आव्हान असते.

2) एका बेंचवर तीन मुलांना बसवावे लागते त्यावेळी शालेय नेतृत्वासमोर आव्हान निर्माण होते.

3) भांडणे, चिडचिड यांचा परिणाम मुलांवर होतो अशा प्रसंगी शालेय नेतृत्वासमोर आव्हान उपस्थित राहते.

4) वर्ग मंत्रिमंडळात स्थान मिळवण्यासाठी विद्यार्थी धडपड करतात सर्वच मुलांना स्थान देता येत नाही अशावेळी शालेय नेतृत्वासमोर आव्हान उपस्थित राहते.
5) विद्यार्थ्यांना शारीरिक विकास करण्यात मैदान अपुरे पडते तेव्हा शालेय नेतृत्वासमोर आव्हान उपस्थित राहते.
6) सर्व मुलांना संधी देता येत नाही अशा वेळी शालेय नेतृत्वासमोर आव्हान उपस्थित राहते.

**पालकांशी संबंधित आव्हाने** -

1) पटनोंदणी व नियमित उपस्थित पालकांचा दृष्टिकोन बदलणे हे शालेय नेतृत्वापुढे आव्हान असते.
2) पालकांचा विश्वास संपादन करण्याचे नेतृत्वाकडे आव्हान असते.
3) पालकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे आव्हान नेतृत्वाकडे असते.
4) दरमहा होणाऱ्या पालक सभा व्यवस्थित पार पाडण्याचे आव्हान शालेय नेतृत्वाकडे असते.
5) पालक संपर्क सतत ठेवण्याचे आव्हान शालेय नेतृत्वाकडे असते.

**पटनोंदणी व नियमित उपस्थितीत यशस्वी शालेय नेतृत्वाचा अभ्यास** -

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर येथे वरिष्ठ अधिव्याख्याता या पदावर कार्यरत असल्याने विद्यार्थी उपस्थिती, शाळा गुणवत्ता या संदर्भात शाळाभेटी केल्या जातात. तसेच जिल्ह्यातील गुणवंत मुख्याध्यापक, शिक्षक यांचे कार्य अनेक उपक्रमांद्वारे नजरेसमोर येते. त्यातूनच प्रत्येक विद्यार्थी शाळेत प्रविष्ठ व्हावा, टिकावा व शिकावा यासाठीचे उत्तम कार्य करणाऱ्या शालेय नेतृत्वाचे काम सर्वांसमोर ठेवल्यास त्याचा निश्चित फायदा होईल. याद्दष्टीने खालील शाळांची यशोगाथा देत आहे.

**पटनोंदणी व नियमित उपस्थितीत शालेय नेतृत्वाचा अभ्यास करण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील निवड करण्यात आलेल्या तीन शाळा**

| अ.क्र. | शाळेचे नाव | मुख्याध्यापकाचे नाव |
|---|---|---|
| १ | श्रीम. लक्ष्मीबाई कृ. जरग विद्यामंदिर. मनपा कोल्हापूर. | श्रीम.निता ठोंबरे |
| २ | कुमार विद्यामंदिर नं. ३ कुरुंदवाड ता. शिरोळ. | श्री.रविकुमार पाटील |
| ३ | विद्यामंदिर कणेरीवाडी ता. करवीर. | श्री.निवृत्ती साळवी |

**यशोगाथा क्रमांक १**
**श्रीम. लक्ष्मीबाई कृ. जरग विद्यामंदिर. मनपा कोल्हापूर जि. कोल्हापूर.**
**मुख्याध्यापक - श्रीम.निता ठोंबरे**

पटनोंदणी व नियमित उपस्थिती १००% पूर्ण करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अशा प्रतिकूल परिस्थितीत आपल्या नेतृत्वाचा यथायोग्य वापर करून मुख्याध्यापक व शिक्षक आपल्या शाळेला यशोशिखरावर घेऊन जाण्यात यशस्वी होताना दिसून येतात .जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत

वरिष्ठ अधिव्याख्याता पदावर कार्यरत असताना शाळा भेटी, शिक्षण परिषदा, वार्षिक तपासणी,शाळा मूल्यांकन,प्रशिक्षण भेटी व विविध कार्यशाळा इत्यादीसाठी संपर्क होतो.समन्वय साधत असताना मनपा श्रीमती लक्ष्मी कृष्णाजी जरग, विद्यामंदिर, जरगनगर या शाळेत भेटी देण्याचा योग आला. शाळेच्या परिसरात पाऊल ठेवल्याबरोबर विद्यार्थ्यांचा अखंड किलबिलाट कानावर पडतो. सदर शाळा डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श योजनेमध्ये आहे. उत्सुकता म्हणून मी शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती नीता ठोंबरे यांना प्रश्न विचारला, "शाळेची इतकी पटसंख्या व उपस्थितीमध्ये आपण कशी वाढ केली"? यावर ठोंबरे मॅडम यांनी उत्तर दिले की, "केवळ आणि केवळ शिक्षकांनी विद्यार्थी गुणवत्ता यावर केलेले काम व टीम वर्क."

पटनोंदणी व नियमित उपस्थितीत प्रभावी कामकाज करण्यात यश प्राप्त केलेल्या यशस्वी शालेय नेतृत्वाची यशोगाथा आपण अभ्यासणार आहोत.



मनपा श्रीमती लक्ष्मीबाई कृष्णाजी जरग येथील मुख्याध्यापक व शिक्षक यांसोबत शाळेतील क्षणचित्रे

अनेक अडथळे पार करत त्यांनी केलेला प्रवास खरोखरच प्रेरणादायी आहे. एक स्त्री मुख्याध्यापक म्हणून काम करताना शाळेतील स्टाफच्या मदतीने शाळेची पटसंख्या व उपस्थिती वाढविली आहे, यातून प्रेरणा घेऊन आपणही आपले नेतृत्व विकसित करून आपली शाळा प्रगतीपथावर घेऊन जाण्यास कृतीप्रवण व्हाल ही अपेक्षा आहे. मनपा श्रीमती लक्ष्मीबाई कृष्णाजी जरग विद्यामंदिर, जरगनगर, जिल्हा.कोल्हापूर. या शाळेत श्रीम.नीता ठोंबरे या मुख्याध्यापक पदावर कार्यरत आहेत. त्यांचा शिक्षक व मुख्याध्यापक पदावर एकूण ३० वर्षांचा अनुभव आहे.

शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री.सरनाईक सर सांगत होते की, 'या शाळेची स्थापना ११/०४/१९९४ रोजी झाली. यावेळी श्री. दिगंबर वासुदेव आराध्ये यांच्याकडे मुख्याध्यापक पदाची जबाबदारी होती. त्यावेळी पटसंख्या केवळ ३२ होती. त्यांच्या मदतीला श्री.उमेश देसाई सहाय्यक शिक्षक होते. त्यावेळी शाळेला स्वतःची इमारत नव्हती. भाडेतत्त्वावर शाळा चालवली जात असे. शाळेला स्वतःचे क्रीडांगण नव्हते .भौतिक सुविधा यथातथाच होत्या. पटाची तर वाणवा होती. मुले परिसरात जाऊन गोळा करावी लागायची. पालक आपल्या पाल्यांना शाळेत घालत नसायचे, कारण पालकांचा शाळेवर विश्वासच नव्हता.

शिक्षक संख्या अपुरी व उपनगरात शाळा असल्याने शिक्षक यायला तयार नसायचे. वसंत खोत नावाच्या शिपाई शिक्षक नसल्याने वर्ग सांभाळायचे काम करायचे. मात्र १९९७ साली पात्र मुख्याध्यापक श्री. पांडुरंग भोसले शाळेत रुजू झाले आणि शाळेचे रूपडे पालटून गेले.

शाळेच्या कृतीशील शिक्षिका श्रीम.पुष्पा गायकवाड म्हणाल्या की, ''साधारणपणे १९९५ साली स्पर्धा परीक्षा शाळेने सुरू केली. चौथीला शिष्यवृत्ती परीक्षेत मुले बसवली. सुरुवातीला दोन वर्षात शिष्यवृत्ती परीक्षेत यश आले नाही. १९९८ ते २००५ दरम्यान शहरी भागातील विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण होऊ लागले. २००७ साली चि. पराग कांबळे नावाचा विद्यार्थी राज्यात पहिला आला. आणि हीच गोष्ट शाळेच्या पटाचा आलेख वाढायला सुरुवात झाली". २००१ साली तत्कालीन नगरसेवक जयवंत नाना कृष्णाची जरग यांनी जागेसह सात खोल्या बांधून दिल्या, शाळेचे यशाची कमान वाढतच गेली.' आज या **शाळेत श्रीमती ठोंबरे यांनी मुख्याध्यापकाची धुरा सांभाळली आहे**. **शाळेत रुजू झाल्याबरोबर त्यांच्यासमोर देखील अनेक खालील आव्हाने होती**.

१] विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था अपुरी होती.

२] वर्ग खोल्यांची संख्या अपुरी होती.

३] पिण्याच्या पाण्याची समस्या होती.

४] अद्यावत प्रयोगशाळा नव्हती.

५] लाईट बिल भागवण्याची समस्या होती.

६]शाळेला पुरेसे इमारत नसल्यामुळे दोन सत्रात भरते.

७] शिक्षकांना विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देता येत नाही.

८] दोन सत्रात शाळा भरत असल्याने तासिकांची संख्या अपुरी पडते.

९] जागेअभावी ज्यादा तास घेता येत नाहीत.

१०] शिक्षकांना स्वाध्याय तपासणी करताना अडचणी येतात.

११] घरातला वेळ शिक्षकांना शाळेसाठी द्यावा लागतो.

१२] सततच्या गोंगाटामुळे शिक्षकांना रक्तदाबाचा त्रास सुरू होत आहे.

१३] शिक्षकांना घशाचा त्रास होत आहे.

१४] शिक्षकांमध्ये ताण-तणाव वाढत आहेत.

१५] शिक्षकांची एकमेकांशी स्पर्धा कायम असते यामुळे देखील ताण वाढत आहे.

१६] शाळेत नियोजनाची समस्या निर्माण होते.

१७] शाळा एकाच सत्रात भरवायची असेल तर विनादप्तर राबवावी लागते.

१८] वेगळेपण जपण्यासाठी अतिरिक्त ताण पडतो.

१९] विद्यार्थी संख्या जास्त असल्याने स्वच्छतागृहाची अडचण होते.

२०] शाळेत शिपायांची संख्या अपुरी होती.

२१] पटसंख्या उपस्थिती व शैक्षणिक गुणवत्ता इत्यादी बाबतीत टिकवून ठेवण्याचे आव्हान होते.

२२]वरिष्ठ कार्यालयाकडून हवे ते सहकार्य मिळत नव्हते.

अशा असुविधेत त्यांनी या शाळेचे नेतृत्व करण्यास सुरुवात केली. आज या शाळेत येणाऱ्या इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांची संख्या २३८० आहे. ही मुले कोणत्या परिसरातून व किती किलोमीटर अंतरावरून येतात ? या प्रश्नावर शाळेतील शिक्षक श्री संदीप जाधव यांनी सांगितले की,'' वेगवेगळ्या परिसरातून विद्यार्थी शाळेत येतात यात जरग नगर,कळंबा,पाचगाव, साने गुरुजी

वसाहत,योगेश्वरी कॉलनी, राम नगर कॉलनी, ज्योतिर्लिंग पार्क,फुलेवाडी, रिंग रोड, मोटेवाडी, कंदलगाव, आर के नगर,मंगळवार पेठ,शिवाजी पेठ, गोकुळ शिरगाव, शांतीनगर,पवार कॉलनी, उजळाईवाडी, नेहरूनगर, राजेंद्र नगर,कात्यायणी पार्क, शेवंती पार्क, बालाजी पार्क, वाशी नाका, नाना पाटील नगर, रामानंदनगर, शिवस्वरूप नगर, स्वामी समर्थ नगर, शेंडा पार्क,इंदिरा घरकुल या परिसरातून येतात.''

या शाळेत पालक मुलांना स्वयंस्फूर्तीने घालतात, इतकेच नाही तर पाल्यांना शाळेत शिकता यावे म्हणून चक्क पालकांचे स्थलांतर झालेले आहे. शाळेच्या परिसरात पालक भाडे तत्वावर रूम घेऊन राहतात, त्यामुळे परिसरातील जागेला सोन्याची किंमत आली आहे .या सर्व भागात प्राथमिक शिक्षणाची सोय असताना देखील मनपा श्रीमती लक्ष्मी कृष्णाजी जरग विद्यामंदिर या शाळेत असे काय वेगळेपण आहे ? जे पालकांना पाल्यासाठी प्रवेश घ्यायला आकर्षित करते व प्रेरित करते? याचे अचूक उत्तर श्रीमती ठोंबरे मॅडम व त्यांचे सहकारी यांच्या कार्यात दिसून येते. सर्वप्रथम श्रीमती ठोंबरे मॅडम यांनी शाळेतील शिक्षकांची बैठक घेतात. बैठकीत पटनोंदणी व नियमित उपस्थिती व शैक्षणिक गुणवत्तेबाबत चर्चा करतात. वाढती पटसंख्या व नियमित उपस्थिती यामध्ये कशाप्रकारे सातत्य राखता येईल? शैक्षणिक गुणवत्तेची कोणत्या उपाययोजना करता कराव्या लागतील जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक परिणाम दिसून येईल याबाबतीत नियोजन करतात. याकरिता त्यांनी डायट या संस्थेचे शैक्षणिक मार्गदर्शन देखील घेतले. पटनोंदणी व नियमित उपस्थिती करिता कोणत्या अडचणी येतात? पटनोंदणी व नियमित उपस्थिती करिता कोणती कार्यनीती वापरावी लागेल? शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ते संदर्भात कोणत्या अन्य घटकांची मदत घेता येईल? शाळेच्या भौतिक विकासासाठी गुणवत्ता विकासासाठी कोण कोणत्या प्रकारे नियोजन करता येईल? याची एक पडताळा सूची केली.सर्वेक्षण केले. शाळेसाठी वाढत्या पटसंख्या करिता कोणकोणत्या भौतिक सुविधा उपलब्ध करून घ्यायच्या आहेत याची एक यादीच बनवली. गुणवत्ता विकासासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील जेणेकरून विद्यार्थ्यांच्या पटनोंदणी उपस्थितीमध्ये सकारात्मक परिणाम दिसून येईल याबाबतीत नियोजन केले. वेळेनुसार शाळेतील शिक्षकांना पालक भेटी व पालक सहभाग घेण्याचे स्वातंत्र्य दिले.

सुरुवातीला समाज व पालक यांचे यांनी फारसा समाधानकारक प्रतिसाद दिला नाही, मात्र दररोज शाळेतील शिक्षक नावीन्यपूर्ण पद्धतीने अध्यापन करतात विद्यार्थ्यांचे गुणवत्ता विकासाठी अनेक उपक्रमाचे नियोजन करतात. विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करतात. विद्यार्थ्यांच्या संदर्भात काही अडचण आल्यास मोबाईलवर किंवा व्हाट्सअप च्या माध्यमातून समाजात शाळेतील मुलांच्या अभ्यासाबाबत चर्चा करतात. खेळ,कृती व आनंदी वातावरणात मुलांशी आंतरक्रिया करतात. त्यामुळे पालकांची भावनिकता जपली जाऊन एक प्रकारची आपुलकी जिव्हाळा हा स्नेहबंध जोडायला सुरुवात झाली. श्रीम. ठोंबरे मॅडम यांनी तर केंद्र,तालुका व जिल्हास्तर होणाऱ्या सर्व बैठकीत सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या कल्पकतेचा व बुद्धिमत्तेचा वापर देखील पटनोंदणी व उपस्थितीसाठी करून घेतला. त्यांनी पटनोंदणी व उपस्थितीची सर्व शासन निर्णय व परिपत्रकाच्या माध्यमातून माहिती घेतली होती. श्रीम. ठोंबरे मॅडम या शांत व अभ्यासू स्वभावाच्या आहेत. संघटन कौशल्य त्यांच्याकडे आहे .कोणालाही न दुखवता अत्यंत प्रेमाने,हळू आवाजात आपले म्हणणे गळी उतरवण्यात त्या यशस्वी होतात. ही बाब आदर व विश्वासास पात्र ठरली. शिक्षकांना वर्गात अध्यापनाचे पूर्ण स्वातंत्र्य देतात. आढावा बैठका घेतात. व्हाट्सअपच्या माध्यमातून सूचना देतात. सर्व बाबतीत शाळेतील शिक्षकांचे शैक्षणिक योगदान घेण्यात त्या यशस्वी झाल्या आहेत .शाळेत ४५ शिक्षक व २३८० विद्यार्थी यांचे सनियंत्रण करणे ही सोपी गोष्ट अजिबात नाही.त्या स्टाफमधील प्रत्येक शिक्षकांचे व शाळेतील विद्यार्थ्यांचे गुण,कौशल्य त्या हेरतात आणि त्याचा उपयोग शाळेच्या विकासासाठी करतात. शाळेचे कोणतेही यश असून माझे स्वतः चे नसून यात सर्वांचा वाटा आहे असे प्रांजळपणे कबूल करतात. शाळेत टीमवर्क अतिशय चांगले आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात भेटीला आलेले कोणतेही प्रशासकीय व्यक्तिमत्व या शाळेला भेट दिल्याशिवाय पुढे जातच नाहीत यातच या शाळेचा नावलौकिक सामावलेला आहे. शाळेत पटनोंदणीत येणाऱ्या अडचणी कोणत्या आहेत? विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी निगडित उपस्थितीचे किती

महत्त्व आहे? शाळा पटनोंदणी व उपस्थिती बाबतीत अपयशी ठरते का ?शाळेच्या प्रगतीसाठी पटनोंदणी व उपस्थितीचे महत्त्व आहे का ?शाळेतील वाढणाऱ्या पटासाठी लागणाऱ्या वर्ग खोल्यांचा अभाव, वाढवणाऱ्या पटाचा बॅलन्स ठेवण्यासाठी होत असलेली ससे होलपट या सर्व बाबी श्रीम.ठोंबरे यांच्या पुढील दिशेला मार्गदर्शक ठरल्या. श्रीम.ठोंबरे यांनी वैयक्तिक सुविधा व शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी उपक्रमांची यादीत शिक्षकांच्या मदतीने केली शाळेतील शिक्षकांनी आवर्जून सहभाग नोंदवला. जरगनगर शाळेत प्रवेशासाठी पालकांच्या रात्रभर रांगा लागलेल्या असतात.





प्रवेशासाठी लागलेल्या रांगा

### शाळेच्या पटनोंदणी बाबत मागील काही वर्षातील सांख्यिकीय माहिती

| अ.क्र. | साल | शाळेचा पट |
|---|---|---|
| १ | १९९४-९५ | ४२ |
| २ | २०१०-११ | ९०९ |
| ३ | २०११-१२ | ९४८ |
| ४ | २०१२-१३ | १०१८ |
| ५ | २०१३-१४ | ११३२ |
| ६ | २०१४-१५ | १२२२ |
| ७ | २०१५-१६ | १३३४ |
| ८ | २०१६-२०१७ | १४२८ |
| ९ | २०१७-२०१८ | १६०६ |
| १० | २०१८-२०१९ | १७४० |
| ११ | २०१९-२०२० | २०५५ |
| १२ | २०२०-२०२१ | २३४८ |
| १३ | २०२१-२०२२ | २३६५ |
| १४ | २०२२-२०२३ | २३७० |
| १५ | २०२३-२०२४ | २३८० |

### मनपा श्रीमती लक्ष्मी कृष्णाजी जरग विद्यामंदिर जरगनगर, जिल्हा कोल्हापूर पट संख्येचा वाढता आलेख




**पटनोंदणी व उपस्थितीबाबत श्रीम. ठोंबरे यांनी खालील बाबींचे पूर्तता केली.**

## शिष्यवृत्तीचा जरगनगर पॅटर्न -

शाळेतील इयत्ता पाचवी स्कॉलरशिप मध्ये २०२२- २३ या शैक्षणिक वर्षात तब्बल ४८ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत आलेले आहेत .आणि १६ विद्यार्थी हे राज्य गुणवत्ता यादीत झळकले आहेत.

**मनपा श्रीमती लक्ष्मी कृष्णाजी जरग विद्यामंदिर जरगनगर, जिल्हा कोल्हापूर जरगनगर पॅटर्न**

**इयत्ता ४थी शिष्यवृत्ती निकाल**

| सन | राज्य गुणवत्ता यादी | जिल्हा गुणवत्ता यादी |
|---|---|---|
| २०१०-११ | १ | २१ |
| २०११-१२ | २ | १८ |
| २०१२-१३ | १ | १५ |
| २०१३-१४ | ५ [ राज्यात प्रथम ] | २५ |
| २०१४-१५ | १ | २२ |

**इयत्ता५ वी शिष्यवृत्ती निकाल**

| सन | राज्य गुणवत्ता यादी | जिल्हा गुणवत्ता यादी |
|---|---|---|
| २०१६-१७ | ५ | २१ |
| २०१७-१८ | ३ | १८ |
| २०१८-१९ | ८ [ राज्यात प्रथम ] | २५ |
| २०१९-२० | १ | २४ |
| २०२०-२१ | १ | २९ |
| २०२१-२२ | ७ | २४ |
| २०२२-२३ | १६ | ४८ |

## बाह्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन -

शाळेत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केले जाते.गणित प्राविण्य, गणित प्रज्ञाशोध, जवाहर नवोदय, सैनिक स्कूल परीक्षा, maths olympiad, डॉ.होमी भाभा बाल वैज्ञानिक, भूगोल प्रज्ञाशोध, हिंदी सुबोध व इतर स्पर्धा परीक्षा यांचे मार्गदर्शन शाळेत केले जाते. यात विद्यार्थी प्राविण्य मिळवतात. विशेष म्हणजे आपल्या वर्गाची तयारी करून घेत असतानाच अध्ययन अध्यापनाबरोबर संबंधित वर्गाचे वर्गशिक्षक विना मोबदला बाह्यपरीक्षांचे देखील तयारी करून घेतात.

## इंडिअन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (ISRO) अभ्यास दौऱ्याची संधी -

महानगरपालिकेच्या १७ विद्यार्थ्यांना पाचवी शिष्यवृत्तीच्या राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळाले. त्यामुळे कोल्हापूर महानगरपालिकेने या १७ विद्यार्थ्यांची इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन अभ्यास दौऱ्यासाठी निवड केली .त्यातील तब्बल १३ विद्यार्थी हे जनक नगर शाळेतील आहे ही गोष्ट शाळेसाठी अत्यंत अभिमानास्पद आहे.

## नवोदय व सैनिक स्कूल परीक्षेतील यश -

शाळेत दरवर्षी नवोदय सैनिक स्कूल परीक्षेसाठी विद्यार्थी बसविले जातात. सन २०२३ या शैक्षणिक वर्षात चार विद्यार्थ्यांची जवाहर नवोदय विद्यालय कागल येथे निवड झाली.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेत शाळेची कामगिरी -

ही शाळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेत सहभागी आहे शाळेने शालेय गुणवत्ता विकास आराखडा तयार केलेला आहे. आराखड्याप्रमाणे शाळेचे कामकाज सुरू आहे. खान अकॅडमी मध्ये शाळेतील शिक्षक ऍक्टिव्ह असतात. शिक्षकांच्या व पालकांच्या मदतीने विद्यार्थी ऑनलाइन गणित स्वाध्याय सोडवितातही शाळा राज्यातील व जिल्ह्यातील टॉप ऍक्टिव्ह शाळा आहे.

## डॉ.होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षा यश -

विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल जागे होण्यासाठी जिज्ञासा जागृत करण्यासाठी व वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी ही परीक्षा घेतली जाते. यावर्षी इयत्ता सहावीचे एकूण नऊ विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या या परीक्षेत शाळेतील ०९ विद्यार्थ्यांपैकी ०३ विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

## गणित प्राविण्य परीक्षेतील यश -

कोल्हापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ कोल्हापूर यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या गणित प्राविण्य परीक्षेत शाळेत २०२२ -२३ या शैक्षणिक वर्षात ७४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी तब्बल ६८ विद्यार्थी गणित प्राविण्य पात्र ठरले. २०२३ - २४ मध्ये ७० विद्यार्थी प्रविष्ट होते त्यापैकी तब्बल ५३ विद्यार्थी गणित प्राविण्य पात्र ठरले.

## गणित प्रज्ञा परीक्षा -

कोल्हापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ कोल्हापूर यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या गणित प्रज्ञा परीक्षेत २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात ६८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी सात विद्यार्थी प्रज्ञा पात्र ठरले आहेत तसेच २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात ५३ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत.

## रोबोटिक लॅब -

शाळेत रोबोटिक लॅब देखील आहे.

## शाळा सुशोभीकरण -

रंगकाम, वृक्षारोपण,संरक्षक भिंत,बोलक्या भिंती मधून शाळेचे सुशोभीकरण करण्यात आले आहे.

## सामाजिक संस्थांचा हातभार -

शाळेची अपुरी इमारत आहे.शाळेत तीस वर्गखोल्या आहेत .अजून पंधरा वर्ग खोल्यांची आवश्यकता आहे .रोटरी क्लब ऑफ दिवस मुंबई यांच्याकडून ३५ लाखाचा निधी उपलब्ध झालेला आहे .या निधीतून चार वर्ग खोल्या बांधण्याचे काम, मैदानाच्या सपाटीकरणाचे काम व दोन स्वच्छतागृहे बांधकाम सुरू आहे. डी मार्ट या सेवाभावी संस्थेकडून सी एस आर अंतर्गत वाचनालय व संगणक कक्ष सुसज्ज करण्यात आला आहे. ग्रंथालयात ५०० पेक्षा जास्त पुस्तके व संगणक कक्षात २१ पेक्षा जास्त

संगणक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त लोकसभागातून १६ स्मार्ट टीव्ही देखील घेण्यात आलेले आहेत याचा उपयोग अध्ययन अध्यापनात केला जातो .

या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थी पटनोंदणी व उपस्थिती, संपादणूक पर्यायाने वाढत आहे. त्यामुळे शाळा सतत यशोशिखरावर दिसत आहे.

## यशोगाथा क्रमांक २
## कुमार विद्यामंदिर नंबर 3 कुरुंदवाड ता.शिरोळ, जि.कोल्हापूर
## मुख्याध्यापक - श्री.रविकुमार पाटील

पटनोंदणी व नियमित उपस्थिती १००% पूर्ण करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अशा प्रतिकूल परिस्थितीत आपल्या नेतृत्वाचा यथायोग्य वापर करून मुख्याध्यापक व शिक्षक आपल्या शाळेला यशोशिखरावर घेऊन जाण्यात यशस्वी होताना दिसून येतात .जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत वरिष्ठ अधिव्याख्याता पदावर कार्यरत असताना शाळा भेटी, शिक्षण परिषदा, वार्षिक तपासणी,शाळा मूल्यांकन,प्रशिक्षण भेटी व विविध कार्यशाळा इत्यादीसाठी संपर्क होतो .समन्वय साधत असताना कुमार विद्यामंदिर नं.3 कुरुंदवाड. केंद्र- मजरेवाडी. तालुका -शिरोळ .जिल्हा- कोल्हापूर या शाळेत भेटी देण्याचा योग आला. शाळेच्या परिसरात पाऊल ठेवल्याबरोबर शाळा अनंत अडचणींना सामोरे जात असल्याचे लक्षात आले. शालेय नेतृत्वाला किती त्रास होत असेल याची जाणीव देखील झाली . शाळा तब्बल चार ठिकाणी भरते ब्राह्मणपुरी, कुरुंदवाड गणपती मंदिर शेजारी, शिवाजी पुतळ्यासमोर धर्मशाळा, जिल्हा परिषद मैदान कुरुंदवाड अशा ठिकाणी वर्ग विभागून भरवले जातात.पटसंख्या सातत्याने वाढत असल्यामुळे मुख्याध्यापक कक्ष देखील वर्गासाठी उपलब्ध करून द्यावा लागला त्यामुळे ऑफिस जिन्याखाली थाटलेले आहे आणि शाळेला मिळालेल्या शिल्ड चक्क पोत्यात भरून ठेवलेल्या आहेत. सदर शाळा पीएमश्री योजनेमध्ये आहे. उत्सुकता म्हणून मी शाळेच्या मुख्याध्यापक श्री. रवीकुमार मायगोंडा पाटील यांना प्रश्न विचारला, "शाळेची इतकी पटसंख्या व उपस्थितीत आपण कशी वाढ केली'? यावर श्री पाटील यांनी उत्तर दिले की, मी शाळेतील शिक्षकांना अध्यापना व्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त काम देत नाही शिक्षक फक्त आपल्या वर्गातील विद्यार्थी व त्यांचा शैक्षणिक विकास एवढाच विचार करायचा बाकी माहिती हवी असेल ती फक्त व्हाट्सअप वर मागितली जाते वर्ग आणि विद्यार्थी सोडून कोणताही शिक्षक अशैक्षणिक कामासाठी शाळेच्या बाहेर जात नाही.'

पटनोंदणी व नियमित उपस्थितीत प्रभावी कामकाज करण्यात यश प्राप्त केलेल्या यशस्वी शालेय नेतृत्वाची यशोगाथा आपण अभ्यासणार आहोत. अनेक अडथळे पार करत त्यांनी केलेला प्रवास खरोखरच जिद्दी व प्रेरणादायी आहे. मुख्याध्यापक म्हणून काम करताना शाळेतील स्टाफच्या मदतीने शाळेची पटसंख्या व उपस्थिती वाढविली आहे यातून प्रेरणा घेऊन आपणही आपले नेतृत्व विकसित करून आपली शाळा प्रगतीपथावर घेऊन जाण्यास प्रेरित व्हाल ही अपेक्षा आहे.



**कुमार विद्यामंदिर नंबर 3 कुरुंदवाड मुख्याध्यापक व शिक्षक बैठकीतील क्षणचित्रे**

कुमार विद्यामंदिर नंबर 3 कुरुंदवाड, तालुका शिरोळ,जिल्हा कोल्हापूर या शाळेत श्री.रवीकुमार पाटील हे मुख्याध्यापक पदावर कार्यरत आहेत. त्यांचा मुख्याध्यापक पदावर 32 वर्षांचा अनुभव आहे. शाळेतील तंत्रस्नेही शिक्षक श्री. लाटकर सर सांगत होते की, "शाळेतील मुख्याध्यापक कडक शिस्तीचे आहेत,ते कोणत्याही प्रकारचा दबाव आमच्यावर आणत नाहीत. त्यांच्याविषयी आमच्या मनामध्ये आदरयुक्त भीती आहे. वर्गात अध्यापनाव्यतिरिक्त कोणतेही काम आम्हाला दिले जात नाही त्यामुळे पूर्ण लक्ष विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर आम्हाला केंद्रित करता येते याचा मला नितांत आनंद व समाधान आहे." 'या शाळेची स्थापना 1957 साली झाली. सन 2007-2008 ला शाळेचा पट केवळ 35 होता. शाळेत व्यसनी शिक्षकाला नियुक्त केले होते शिव्या भांडा भांडी हे तर रोजच अनुभवास येत होते शाळा बंद पडायच्या मार्गावर होते या कालावधीत श्री रविकुमार पाटील या शाळेत रुजू झाले आणि शाळेचा कायापालट होण्यास सुरुवात झाली.पालक मीटिंग घेऊन पालकांना भावनिक आव्हान केले,पालकांचे सहकारी मागितले . शाळेला शिस्त लावली. शाळेचा गणवेश बदलला. सकाळी आठ ते रात्री आठ पर्यंत वृषभ चौगुले, विठू बंडगर व रवी कुमार पाटील समन्वयाने वर्ग अध्यापनाचे काम करत होते. त्यावर्षी एकूण सहा मुले शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आणि त्यातील एक राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आला आणि शाळेकडे बघण्याचा पालकांचा दृष्टिकोनच बदलून गेला. या शाळेत श्री. रवीकुमार पाटील यांनी मुख्याध्यापकाची धुरा सांभाळली. शाळेत रुजू झाल्याबरोबर त्यांच्यासमोर अनेक खालील आव्हाने होती.

1) शाळा नगरपालिका हद्दीत असल्यामुळे जिल्हा परिषदेचा मतदार संघ नसल्यामुळे जिल्हा परिषदेचे सदस्य उपलब्ध निधीतून खर्च करू शकत नाहीत आणि नगरपालिका देखील सदर शाळा जिल्हा परिषदेचे असल्यामुळे आर्थिक सहकार्य करत नाही.
2) पालकांचा शाळेविषयी नकारात्मक दृष्टिकोन होता.
3) विद्यार्थ्यांचे कौटुंबिक पार्श्वभूमी फारशी चांगली नव्हती. मुलांमध्ये संस्कार व मूल्य रुजलेली नव्हती.
4) शाळेतून विद्यार्थी इतर शाळांमध्ये स्थलांतरित होण्याचे प्रमाण जास्त होते.
5) गावातीलच मुले बाहेरच्या गावी शिकत होती.
6) मध्यमवर्गीय व श्रीमंत पालकांचा ओढा हा इतर माध्यमांच्या शाळांकडे होता.

7) शहरातील खाजगी शाळांचा प्रचंड विरोध होतो. अशा असुविधेत त्यांनी या शाळेचे नेतृत्व करण्यास सुरुवात केली.
8) विरोधकांचा शालेय नेतृत्वाची बदली, निलंबन व तक्रारी करण्याचा प्रयत्न झाला आहे.

आजमितीस शाळेत येणाऱ्या इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांची संख्या 987 आहे. ही मुले कोणत्या परिसरातून व किती किलोमीटर अंतरावरून येतात ? या प्रश्नावर मुख्याध्यापकांनी सांगितले की, 'वेगवेगळ्या परिसरातून विद्यार्थी शाळेत येतात शाळेत 200 पेक्षा जास्त मुले नृसिंह वाडी, औरवाड गौरवाड कवठे बुलंद गणेश वाडी बोबनाळ आलास शिरढोण तेरवाड हेरवाड मजरेवाडी अक्किवाट राजापूर या परिसरातून येतात.'

शाळा चार ठिकाणी भरत असताना बैठक व्यवस्था अडचणीची असताना सुद्धा पालक मुलांना स्वयंस्फूर्तीने घालतात.गावात प्राथमिक शिक्षणाची सोय असताना,इतर माध्यमाच्या शाळा असताना देखील कुमार विद्यामंदिर नंबर तीन कुरुंदवाड या शाळेत असे काय वेगळेपण आहे जे पालकांना पाल्यासाठी प्रवेश घ्यायला आकर्षित करते व प्रेरित करते याचे अचूक उत्तर श्री.रविकुमार पाटील व त्यांचे सहकारी यांच्या कार्यात दिसून येते.

सुरुवातीला समाज व पालक यांनी फारसा समाधानकारक प्रतिसाद दिला नाही, मात्र दररोज शाळेतील शिक्षक नावीन्यपूर्ण पद्धतीने अध्यापन करतात विद्यार्थ्यांचे गुणवत्ता विकासाठी अनेक उपक्रमाचे नियोजन करतात. विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करतात. विद्यार्थ्यांच्या संदर्भात काही अडचण आल्यास मोबाईलवर किंवा व्हाट्सअपच्या माध्यमातून समाजात शाळेतील मुलांच्या अभ्यासाबाबत चर्चा करतात. खेळ,कृती व आनंदी वातावरणात मुलांशी आंतरक्रिया करतात. त्यामुळे पालकांची भावनिकता जपली जाऊन एक प्रकारची आपुलकी जिव्हाळा हा स्नेहबंध जोडायला सुरुवात झाली. श्री. पाटील यांनी तर केंद्र, तालुका व जिल्हास्तर होणाऱ्या सर्व बैठकीत सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या कल्पकतेचा व बुद्धिमत्तेचा वापर देखील पटनोंदणी व उपस्थितीसाठी करून घेतला. त्यांनी पट नोंदणी व उपस्थितीची सर्व शासन निर्णय व परिपत्रकाच्या माध्यमातून माहिती घेतली होती.

श्री. पाटील अभ्यासू,रोखठोक, धडपड्या स्वभावाचे व कडक शिस्तीचे आहेत. उत्तम संघटन कौशल्य, अचूक नियोजन व निर्णय क्षमता त्यांच्याकडे आहे. ते शिक्षकांना वर्गात अध्यापनाचे पूर्ण स्वातंत्र्य देतात, सहकारी शिक्षकांच्या मतांचा आदर करतात. शिक्षक व विद्यार्थी यांना चांगल्या कामाबद्दल सतत प्रोत्साहन देतात. आढावा बैठका घेतात. शिक्षकांकडे असणाऱ्या ज्ञान व कौशल्याचा वापर शाळेच्या गुणवत्तेसाठी व प्रगतीसाठी करतात. सर्व बाबतीत शाळेतील शिक्षकांचे शैक्षणिक योगदान घेण्यात ते यशस्वी झाले आहेत. शाळा चार ठिकाणी भरवणे व 987 विद्यार्थी यांचे सनियंत्रण करणे ही सोपी गोष्ट अजिबात नाही. शाळेतील सर्व मानवी घटकांमध्ये संघभावना अतिशय चांगली आहे.

शाळेत पटनोंदणीत येणाऱ्या अडचणी कोणत्या आहेत? विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी निगडित उपस्थितीचे किती महत्त्व आहे? शाळा पटनोंदणी व उपस्थिती बाबतीत अपयशी ठरते का ?शाळेच्या प्रगतीसाठी पटनोंदणी व उपस्थितीचे महत्त्व आहे का ?शाळेतील वाढणाऱ्या पटासाठी लागणाऱ्या वर्ग खोल्यांचा अभाव, वाढवणाऱ्या पटाचा बॅलन्स ठेवण्यासाठी होत असलेली ससे होलपट या सर्व बाबी श्री.पाटील यांच्या पुढील दिशेला मार्गदर्शक ठरल्या श्री.पाटील यांनी वैयक्तिक सुविधा व शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी उपक्रमांची यादीत शिक्षकांच्या मदतीने केली शाळेतील शिक्षकांनी आवर्जून सहभाग नोंदवला.







## कुमार विद्यामंदिर नंबर 3 कुरुंदवाड
## शाळेच्या पटनोंदणी बाबत मागील पाच वर्षातील सांख्यिकीय माहिती

| अ.क्र. | साल | शाळेचा पट |
|---|---|---|
| १ | २०१९-२०२० | ३५४ |
| २ | २०२०-२०२१ | ९०० |
| ३ | २०२१-२०२२ | १००४ |
| ४ | २०२२-२०२३ | १००३ |
| ५ | २०२३-२०२४ | ९९४ |

**कुमार विद्यामंदिर नंबर 3 कुरुंदवाड**
**विद्यार्थ्यांचे बौद्धिक व क्रीडा क्षेत्रातील यश**

| अ.क्र. | शैक्षणिक वर्ष | प्रकार | विदयार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | २०१९-२० | क्रीडा | २२ |
| | | बौद्धिक | १३ |
| २ | २०२०-२१ | क्रीडा | २८ |
| | | बौद्धिक | १८ |
| ३ | २०२१-२०२२ | क्रीडा | २५ |
| | | बौद्धिक | २१ |

**पटनोंदणी व उपस्थितीबाबत श्री.पाटील यांनी खालील बाबींचे पूर्तता केली.**

- शाळेमध्ये व्हर्च्युअल क्लासरूमची सुविधा उपलब्ध आहे.
- विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी रूपमल्लखांबचा नियमित सराव असतो.
- अबॅकस चे वर्ग सुरू असतात त्यात विद्यार्थी गणिताची तंत्रे शिकून घेतात.
- एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेत सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होतात.
- तब्बल साडे सतरा लाखाचा शैक्षणिक उठाव शाळेने केला आहे.

**शाळा प्रवेशासाठी माऊथ पब्लिसिटी-**

शाळेत शिक्षकांनी फक्त आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी अध्ययन अध्यापनाचे काम करायचे असल्यामुळे इतर ऑफिसशी संबंधित अशैक्षणिक कामे शिक्षकांना दिली जात नाहीत त्यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावलेला आहे त्यामुळे शाळेची प्रगती पाहून शाळा प्रवेश घेण्यासाठी पालकांचा ओढा या शाळेकडे असतो केवळ माऊथ पब्लिसिटी मुळे शाळेत प्रवेश होतात.

**शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून एक लिपिक नियुक्त -**

ऑफिसशी संबंधित अशैक्षणिक कामे शिक्षकांना दिली जात नाहीत त्यासाठी श्री पाटील सर यांनी शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने शाळेमध्ये एका लिपिकाची नियुक्ती केली आहे संबंधित लिपिक कार्यालयाशी संबंधित सर्व कामे करतो.

**गुढीपाडवा प्रवेशोत्सव -**

गुढीपाडव्या दिवशी सकाळी आठ ते बारा या वेळेत प्रवेश देण्यासाठी सुरुवात केली जाते यासाठी चार टेबल मांडले जातात व आठ शिक्षक प्रवेश प्रक्रिया पूर्ण करतात दीडशे प्रवेश झाल्यानंतर प्रवेश बंद केले जातात कारण बैठक व्यवस्था नसल्यामुळे शाळेला नाईलाजास्तव प्रवेश देता येत नाही. चालू शैक्षणिक वर्षात शाळेने 200 प्रवेश नाकारले आहेत.

**पालकांचे व्हाट्सअप ग्रुप-**

नियमित उपस्थिती राहावी यासाठी पालकांचे whatsapp ग्रुप तयार करण्यात आलेले आहेत विद्यार्थी वर्गात अनुपस्थित असेल तर संबंधित शिक्षक पालकांना फोन करतात व्हाट्सअप ग्रुप वर मेसेज देखील टाकतात त्यामुळे पालकांवर आपोआप विद्यार्थी उपस्थित ठेवण्याचे नैतिक दडपण येते.

### अनुपस्थित मुलांसाठी उपाय योजना-

विद्यार्थी अनुपस्थित असेल तर स्वतः मुख्याध्यापक पाठपुरावा करतात विद्यार्थी शिक्षक व पालक या तिन्ही पातळ्यावर क्रॉस चेक करतात सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांचे अनुपस्थितीचे प्रमाण वाढत होते तेव्हा मात्र श्री पाटील सर यांनी पालक मीटिंग घेऊन आपल्या पाल्यांकडे लक्ष कशाप्रकारे द्यावे याचे मार्गदर्शन केले काही पालकांना खाजगी पातळीवर देखील सल्ले दिले प्रत्यक्ष घरी भेट देऊन बरोबर शेजारी राहणाऱ्या मुलाच्या मदतीने अनुपस्थित विद्यार्थ्याला चेक करून त्याचा रिपोर्ट पालकांना दिला शाळेशेजारीत खाजगी संस्था असल्यामुळे शाळेच्या वेळामध्ये बदल असतो. इतर मुलांच्या संगतीत राहून मुले चुका करतात उदाहरणार्थ विद्यार्थ्यांना घोडागाडी शर्यतीचा नाद लागणे इतर हायस्कूलच्या मुलांबरोबर व्यसन करणे नदीवर पोहायला जाणे क्रिकेट खेळणे अशा गोष्टी शाळेतील विद्यार्थ्यांच्या कडून घडत होत्या त्याला आळा घालण्यासाठी पालक बैठकीत प्रबोधन केले जाते पालकांना भावनिक आवाहन केले जाते प्रसंगी कडक सूचना दिल्या जातात पालकांच्या अपेक्षा पूर्तीसाठी झटणारे मुख्याध्यापक म्हणून श्री पाटील सर यांना या गोष्टीत यश मिळते.

### शिक्षकांशी समन्वय -

शालेय नेतृत्वाचा शाळेतील शिक्षकांशी समन्वय चांगला असल्यामुळे पट नोंदणी व नियमित उपस्थितीत याचा सकारात्मक परिणाम दिसून येतो.

### गावातील प्रतिष्ठित आर्थिकदृष्ट्या सबल सुशिक्षित व्यक्तींची मदत -

शाळेला आर्थिक मदत प्राप्त करून देण्यासाठी शालेय नेतृत्व गावातील काही प्रतिष्ठित व्यक्तींची मदत घेते त्यामुळे शाळेला अनेक भौतिक सुविधांची मदत झाली आहे.

### शाळा व्यवस्थापन समितीची मदत -

अनेक शैक्षणिक कामासाठी शाळा व्यवस्थापन समितीची मदत घेतली जाते स्वतः शाळा व्यवस्थापन समितीने विद्यार्थी ज्ञान करण्यासाठी शाळेला दोन गाड्या उपलब्ध करून दिल्या आहेत त्याचबरोबर बारा गाड्यातून विद्यार्थी शाळेत येतात.

### माजी विद्यार्थ्यांची मदत-

ंच्या मदतीने देखील शाळा विकासाचा प्रयत्न केला जातो.

### शाळा पूर्वतयारी उत्तम-

शाळेला बालवाडी नव्हती त्यामुळे इयत्ता पहिलीच्या पाठाचा प्रश्न कायम उपस्थित राहत असे शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने सध्या एकूण शाळा पूर्वतयारीच्या पाच तुकड्या सुरू आहेत 224 विद्यार्थी बाल शिक्षण घेत आहेत इयत्ता पहिलीच्या वर्गासाठी चांगल्या पद्धतीने शाळा पूर्वतयारी करून घेतली जात आहे.

## शिष्यवृत्ती व एन एम एम एस परीक्षेत उज्वल यश -

शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षा देखील उज्वल अशी परंपरा आहे शैक्षणिक वर्ष 2022 23 मध्ये शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेचे सात विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र झाले आहेत तसेच एन एम एम एस परीक्षा मध्ये दोन विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत.

## शाळेचे स्नेहसंमेलन -

सर्व विद्यार्थ्यांसाठी शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी दिली जाते याचा सकारात्मक परिणाम उपस्थिती व पट नोंदणीवर दिसून येतो.

## शाळाबाह्य स्पर्धांचे मार्गदर्शन -

प्रत्येक वर्गाचा अभ्यासक्रम पूर्ण करून घेण्याबरोबरच शाळेतील शिक्षक इतर बाह्य परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.

## पालक मीटिंग -

प्रत्येक वर्गाची व संपूर्ण शाळेची अशी मिळून पालक बैठक घेतली जाते या बैठकीमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आरोग्य विषयक बाबींवर चर्चा होते.

## शालेय नेतृत्वाचे दातृत्व -

श्री पाटील सर यांनी वडिलांच्या स्मरणार्थ शाळेत एक हॉल बांधला आहे वाढती पटसंख्या असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या बैठक व्यवस्थेचा प्रश्न उपस्थित होतो या हॉलचे पार्टिशन करून त्याचे चार वर्ग खोल्यात रूपांतर केले आहे.

## शालेय नेतृत्वाचे मार्गदर्शन -

स्थानिक स्वराज्य संस्थेची मदत नसताना शाळा नगरपालिकेत असल्यामुळे नगरपालिकेची मदत नसताना शाळेचा पट तब्बल 987 वर पोहोचला असल्याने या नेतृत्वाच्या यशामुळे माजी जिल्हाधिकारी श्री इंद्रजीत देशमुख साहेब यांनी शारदा प्रतिष्ठान बारामती या ठिकाणी कमी पट होत असलेल्या शाळांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी श्री. पाटील यांनी पार पाडली आहे.

## शालेय नेतृत्वाची संवेदनशीलता व सहकार्य -

शाळेत इयत्ता दुसरीच्या वर्गासाठी बैठक व्यवस्था अपुरी पडत होते त्यावेळी स्वतः पाटील यांनी आपले कार्यालय जिन्याखाली ॲडजेस्ट केले आणि आणि आपले कार्यालय इयत्ता दुसरीसाठी उपलब्ध करून दिले.

शाळेमध्ये व्हर्च्युअल क्लासरूमची सुविधा उपलब्ध करून घेण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी रूपमल्लखांबचा नियमित सराव असतो.

अबॅकस चे वर्ग सुरू असतात त्यात विद्यार्थी गणिताची तंत्रे शिकून घेतात.

एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेत सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होतात.

तब्बल साडे सतरा लाखाचा शैक्षणिक उठाव शाळेने केला आहे.

**शाळेला मिळालेले पुरस्कार**

- ❖ जिल्हा परिषद कोल्हापूर आदर्श शाळा पुरस्कार
- ❖ डॉ. जे. पी.नाईक माझी शाळा समृद्ध शाळा शिरोळ तालुका प्रथम क्रमांक
- ❖ कुरुंदवाड नगरपरिषद कुरुंदवाड स्वच्छता अभियान पुरस्कार
- ❖ मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा केंद्रस्तर पुरस्कार

या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थी पटनोंदणी व उपस्थिती, संपादणूक पर्यायाने वाढत आहे. त्यामुळे शाळा सतत प्रगतीपथावर जात असल्याचे दिसून येत आहे.

## यशोगाथा क्रमांक ३
## विद्या मंदिर कणेरीवाडी,केंद्र,कणेरी,तालुका.करवीर,जिल्हा कोल्हापूर.

मुख्याध्यापक - श्री.निवृत्ती साळवी

या शाळेत श्री.निवृत्ती साळवी मुख्याध्यापक पदावर कार्यरत आहेत. त्यांचा मुख्याध्यापक पदावर 32 वर्षांचा अनुभव आहे. शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका श्रीम लक्ष्मी पाटील सांगत होत्या की, "या शाळेची स्थापना 1930 साली झाली. गाव शहराच्या जवळ आहे .MIDC परिसर असल्यामुळे गोकुळ शिरगाव, कागल पंचतारांकित आणि आंतरराष्ट्रीय महामार्ग असल्यामुळे औद्योगिक विकास येथे जोरात चालतो. सुशिक्षित पालक या भागात जास्तीत जास्त आहेत.









शंभर विद्यार्थ्यांना पहिलीसाठी प्रवेश

हेरले : प्रतिनिधी

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर विद्यामंदिर कणेरीवाडी शाळेत इयत्ता पहिलीच्या वर्गात १०२ विद्यार्थ्यांनी सोशल डिस्टन्सिंगचे पालन करून मास्क, सॅनिटायझरचा वापर करत प्रवेश घेतला. विद्यामंदिर कणेरीवाडी ही शाळा राज्यात सर्वत्र डिजिटल शाळा म्हणून नावारूपास आली आहे. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर नूतन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कुमार मोरे, उपाध्यक्ष रवींद्र खोत, सदस्य सरदार मोरे, रामचंद्र कदम, मुख्याध्यापक राहुल ढाकणे, प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या संचालिका लक्ष्मी पाटील, छाया पानारी, विष्णू खोत, दौलतराव कोल्हापुरे, प्रतिभा पाटील, जयश्री पाटील, दीपाली जरग, मनोहर बावडेकर, राजू वाभाडे, डी. बी. आरडेकर, शैलजा गरडकर, अर्चना गुरव, विद्या जाधव, शुभांगी सुतार, स्वप्नाली कागर यांच्यासह सर्व शिक्षक उपस्थित होते.

## विद्या मंदिर कणेरीवाडी, केंद्र कणेरी तालुका करवीर जिल्हा कोल्हापूर मुख्याध्यापक व शिक्षक बैठकीतील क्षणचित्रे

शाळेच्या कृतीशील शिक्षिका श्रीम लक्ष्मी पाटील म्हणाल्या की, पालकांचा कल हा सेमी इंग्लिश कडे होता. एमआयडीसी भाग असल्यामुळे शाळेमध्ये देशभरातील मुले येतात. यात बिहार, उत्तर प्रदेश व कर्नाटक राज्यातील मुलांची संख्या जास्त आहे भाषेची अडचण देखील वर्गात अध्यापन करताना येत असते त्याचबरोबर खाजगी शाळांकडे पालकांचा ओढा जास्त आहे परंतु सगळ्या अडचणींवर मात करून टप्प्याटप्प्याने शाळेतील भौतिक सुविधा व गुणवत्ता समाजाला दाखवून दिल्यामुळेशाळेची यशाची कमान वाढतच गेली.' या शाळेत श्री. निवृत्ती पाटील यांनी मुख्याध्यापकाची धुरा सांभाळली आहे. शाळेत रुजू झाल्याबरोबर त्यांच्यासमोर अनेक खालील आव्हाने होती.

1] शाळेत शिक्षकांची संख्या कमी होती, शिक्षकेतर कर्मचारी नाहीत.
2] शिक्षकांच्या रजेच्या कालावधीत वर्गाचे व्यवस्थापन करणे कठीण होत होते.
3] 30 पेक्षा जास्त विद्यार्थी वर्गात असल्यामुळे वर्ग नियंत्रण करण्यात अडचणी होत्या.
4] शाळेत विविध भाषिक विद्यार्थी असल्यामुळे अध्ययन अनुभव देताना शिक्षकाचा कस लागायचा.
5] विद्यार्थी सातत्याने गुंतवून ठेवणे शक्य होत नव्हते.
6] विद्यार्थी परराज्यातील असल्यामुळे काही कारणानिमित्त पालकांच्या बरोबर गेले की उपस्थितीमध्ये खूपच खंड पडायचा.
7] बरेच वेळा मूळ अध्यापनाच्या कामापासून दूर जाऊन इतर शैक्षणिक कामात वेळ जायचा.
8] पाण्याची व्यवस्था अपुरी होती.
9] स्वच्छतागृहांची संख्या अपुरी होती.
10] जागेची उपलब्धता कमी होती.
11] शाळेत ई लर्निंग सुविधा नव्हती.
12] वर्ग खोल्या अपुऱ्या होत्या.
13] स्वच्छतागृहाची सोय नव्हती.
14] विविध राज्यातील पालक वर्ग असल्याने भाषिक अडचणी येत होत्या.
15] स्थानिक राजकारणाचे आव्हान होते.
16] खाजगी शाळांकडे पालकांचा ओढा होता.

मुख्याध्यापकांना पटसंख्या , उपस्थिती व शैक्षणिक गुणवत्ता इत्यादी बाबतीत टिकवून ठेवण्याचे आवाहन होते.चालू वर्षी शाळेत येणाऱ्या इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांची संख्या 826 आहे. ही मुले कोणत्या परिसरातून व किती किलोमीटर अंतरावरून येतात? या प्रश्नावर शाळेतील शिक्षिका लक्ष्मी पाटील यांनी सांगितले की, "कणेरी, कागल एमआयडीसी, गोकुळ शिरगाव, या परिसरातून मुले शाळेत येतात. औद्योगिक वसाहत असल्यामुळे परराज्यातील पालकांचे स्थलांतर झालेले आहे. अशा पाल्यांना भाषिक अडचणी येतात परंतु शाळा मराठी व हिंदी भाषेचा समन्वय साधत असल्यामुळे या शाळेत पालक मुलांना स्वयंस्फूर्तीने घालतात.या सर्व भागात प्राथमिक शिक्षणाची सोय असताना देखील विद्या मंदिर कणेरीवाडी या शाळेत शाळेत असे काय वेगळेपण आहे जे पालकांना पाल्यासाठी प्रवेश घ्यायला आकर्षित करते व प्रेरित करते याचे अचूक उत्तर श्री .निवृत्ती साळवी यांनी दिले. ते म्हणाले की, या शाळेतील शिक्षकांचे अध्ययन अध्यापन, शिक्षणातील वेगवेगळे प्रयोग, सहशालेय उपक्रमांची अंमलबजावणी, विविध स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती, प्रज्ञाशोध, नवोदय , केटीएस इत्यादी च्या माध्यमातून शिक्षक सतत विद्यार्थ्यांचे सर्वांगीण प्रगती करण्यासाठी झटत असतात".

श्री. साळवी यांनी शाळेला गावातील शाळा व्यवस्थापन समिती, सरपंच, इतर लोकप्रतिनिधी व माजी विद्यार्थी यांचे सहकार्य घेऊन शाळेसाठी वाढत्या पटसंख्येकरिता कोणकोणत्या भौतिक सुविधा उपलब्ध करून घ्यायचा आहेत याची एक यादीच बनवली. गुणवत्ता विकासासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील जेणेकरून विद्यार्थ्यांच्या पटनोंदणी उपस्थितीमध्ये सकारात्मक परिणाम

दिसून येईल याबाबतीत नियोजन केले. वेळेनुसार शाळेतील शिक्षकांना पालक भेटी व पालक सहभाग घेण्याचे स्वातंत्र्य दिले. शिक्षक विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करतात. विद्यार्थ्यांच्या संदर्भात काही अडचण आल्यास मोबाईलवर किंवा व्हाट्सअप च्या माध्यमातून समाजात शाळेतील मुलांच्या अभ्यासाबाबत भाषिक अडचणी असून सुद्धा त्यातून यशस्वी मार्ग काढतात खेळ,कृती व आनंदी वातावरणात मुलांशी आंतरक्रिया करतात. श्री.साळवी यांनी केंद्र ,तालुका व जिल्हास्तर होणाऱ्या सर्व बैठकीत सक्रिय सहभाग घेतला आहे. ते शांत व मनमिळाऊ स्वभावाचे आहेत. सर्वांना सोबत घेऊन काम करण्यात त्यांचा हातखंडा आहे. इंग्रजी विषयावर असलेले प्रभुत्व, सुंदर हस्ताक्षर व अमोघ वक्तृत्व कौशल्य या अंगभूत गुणांचा वापर शाळेच्या प्रगतीसाठी त्यांनी केलेला आहे. काम करून घेण्याची लकब त्यांच्याकडे आहे. त्यांच्या अनुभवाचा वापर त्यांनी पटनोंदणी व उपस्थितीसाठी करून घेतला आहे. त्यांनी पटनोंदणी व उपस्थितीची सर्व शासन निर्णय व परिपत्रकाच्या माध्यमातून माहिती घेतली होती. श्री. साळवी यांच्याकडे शाळेतील शिक्षकांच्या कडून काम करून घेण्याचे व संघटन करण्याचे कौशल्य आहे. शाळेतील अनुभव शिक्षकांच्या अनुभवाचा वापर देखील ते करतात प्रगतीच्या कल्पना समजून त्यावर काम करतात. ही बाब आदर व विश्वासच पात्र ठरली.

शाळेत पटनोंदणीत येणाऱ्या अडचणी कोणत्या आहेत? विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी निगडित उपस्थितीचे किती महत्त्व आहे? शाळा पटनोंदणी व उपस्थिती बाबतीत अपयशी ठरते का ?शाळेच्या प्रगतीसाठी पटनोंदणी व उपस्थितीचे महत्त्व आहे का ?शाळेतील वाढणाऱ्या पटासाठी लागणाऱ्या वर्ग खोल्यांचा अभाव, श्री.पाटील यांच्या पुढील दिशेला मार्गदर्शक ठरल्या. श्री.साळवी यांनी वैयक्तिक सुविधा व शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी उपक्रमांची यादीत शिक्षकांच्या मदतीने केली शाळेतील शिक्षकांनी आवर्जून सहभाग नोंदवला.गावातील स्थानिक लोकप्रतिनिधी शाळा व्यवस्थापन समिती शाळेचे माजी विद्यार्थी यांच्या मदतीने शाळेचा विकासाच होत गेला. कोरोना काळात देखील या सर्वांनी शाळेच्या भौतिक सुविधा वाढविण्यासाठी स्वतः योगदान दिले आहे.



शाळेतील शिक्षक, गावकरी यांचे समवेत

पटनोंदणी बाबत मागील पाच वर्षातील सांख्यिकीय माहिती विद्या मंदिर कणेरीवाडी

| अ.क्र. | साल | शाळेचा पट |
|---|---|---|
| १ | २०१९-२०२० | ५५४ |
| २ | २०२०-२०२१ | ६८८ |
| ३ | २०२१-२०२२ | ७७८ |
| ४ | २०२२-२०२३ | ७८९ |
| ५ | २०२३-२०२४ | ८८७ |

विद्या मंदिर कणेरीवाडी विद्यार्थ्यांचे बौद्धिक व क्रीडा क्षेत्रातील यश

| अ.क्र. | शैक्षणिक वर्ष | प्रकार | विदयार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | २०१९-२० | क्रीडा | २५ |
| | | बौद्धिक | २० |
| २ | २०२०-२१ | क्रीडा | २२ |
| | | बौद्धिक | १० |
| ३ | २०२१-२०२२ | क्रीडा | २२ |
| | | बौद्धिक | १४ |
| ४ | २०२२-२३ | क्रीडा | २० |
| | | बौद्धिक | २१ |
| ५ | २०२३-२४ | क्रीडा | १७ |
| | | बौद्धिक | २२ |

**पट नोंदणी व उपस्थिती बाबत श्री.साळवी यांनी खालील बाबींचे पूर्तता केली --**

1] आकर्षक व बोलकी शाळा:- शाळेत प्रत्येक शिकावा म्हणून वर्गात ई लर्निंग चे सुविधा उपलब्ध करून दिली आहे प्रत्येक वर्गात साऊंड सिस्टिम आहे एकाच वेळी कार्यालयातून सर्व शिक्षक व विद्यार्थी यांच्याशी संपर्क साधला जातो बोलकी शाळा व बोलके वर्ग विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रित करून घेतात एकाच वेळी सर्व विद्यार्थ्यांना बसण्यासाठी देखील एक हॉल तयार केला गेला आहे या हॉलमध्ये विविध कार्यक्रम व दैनंदिन परिपाठ घेतला जातो.

2] माजी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग:- शाळेतील माजी विद्यार्थी शाळेच्या भौतिक विकासासाठी व संविधान साठी 500/- ते 25000/- पर्यंत देणगी रूपात रक्कम देतात वर्ग खोल्यांचे बांधकाम संरक्षक भिंत परसबाग तयार करण्यासाठी स्वतः श्रमदान करतात श्री. मोहन कदम हे या शाळेतील माजी विद्यार्थी आहेत ते पीडब्ल्यूडी विभागातून सेवानिवृत्त झाले आहेत शाळेच्या बांधकामाच्या काळात ते सकाळी सात ते रात्री दहापर्यंत शाळेसाठी आपले योगदान देत होते.

3] शिक्षक विद्यार्थी मुख्याध्यापक यांचा समन्वय :- विद्यार्थी शाळेत नियमित येण्यासाठी शिक्षक व मुख्याध्यापक सतत प्रयत्नशील असतात शाळेतील शिक्षक आनंददायी शिक्षण देतात कृतीयुक्त शिक्षण

देतात चार भिंतींच्या बाहेर विद्यार्थ्यांना शालेय अनुभव देतात क्षेत्रभेटी देतात शैक्षणिक सहलींच्या आयोजन करतात मुलांना देखील अशा वातावरणामुळे शाळा हवीहवीशी वाटते,

4] गावाचे राजकारण बाजूला ठेवून शाळेच्या प्रगती कडे लक्ष केंद्रित करण्यात यशः- गाव तिथं भानगडी या येतातच. मात्र श्री. साळवी यांनी गावातील राजकारण, गट, तट बाजूला करण्यात यश मिळवले. शाळेची आवड असणाऱ्या शाळेविषयी संवेदनशील असणाऱ्या सर्व जिल्हा परिषद सदस्यांना स्थायी समितीच्या सदस्यांना उपाध्यक्षांना एकत्रित घेऊन शाळेच्या विकासासाठी योगदान देण्यासाठी प्रयत्न केले.

5] शाळेच्या आर्थिक कारभारात पारदर्शकता :- शाळेच्या विकासासाठी जिल्हा परिषदेकडून तसेच समाजाकडून प्राप्त झालेल्या निधीचा आर्थिक कारभार हा पारदर्शक ठेवण्यात आला आर्थिक व्यवहार हा सर्वसामान्य लोकांकडे दिला गेला पावती बुक एकाकडे पैसे दुसऱ्याकडे व खर्च तिसऱ्याकडे असे आर्थिक व्यवहाराचे विभाजन केले गेले त्यामुळे आलेला शंभर टक्के निधी हा शाळेच्या विकासासाठी वापरण्यात आला.

6] गुढीपाडवा व पटनोंदणी :- शाळेतील पट नोंदणीचे वेगळेपण म्हणजे गुढीपाडव्या दिवशी विद्यार्थ्यांना इयत्ता पहिली प्रवेश दिला जातो या दिवशी प्रवेश फॉर्म भरून घेतले जातात एकूण दहा टेबल लावले जातात व पट नोंदणीचे प्रवेशाची प्रक्रिया राबविली जाते यासाठी जनजागृती केले जाते पालकांच्या गृहभेटीवर भर दिला जातो.

7] शासकीय योजनांचे प्रभावी अंमलबजावणी :- या शासकीय योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे केले जाते शाळेत शालेय पोषण आहार योजना प्रभावी रीतीने राबविली जाते त्याचबरोबर शाळेतील शंभर टक्के विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप केले जाते यासाठी लोकप्रतिनिधींचा लोकप्रतिनिधींची मदत होते शाळेत पाठ्यपुस्तके वाटप केली जातात इतर शैक्षणिक साहित्य देखील मोफत वाटप केले जाते विविध उपक्रम कृती यांचे आयोजन करून गुणवत्ता वाढीकडे लक्ष दिले जाते विद्यार्थी शिक्षक पालक यांचे एक बोर्डिंग तयार झालेले आहे त्यामुळे सर्व पेक्षा जास्त पट नोंदणी होत असल्याचे दिसून येते.

8] लोकप्रतिनिधी ग्रामपंचायत आणि शिक्षक यांचा समन्वय :-शाळेच्या विकासासाठी लोकप्रतिनिधी ग्रामपंचायत आणि शिक्षक यांचा समन्वय चांगल्या पद्धतीने दिसून येतो समाज शाळेच्या विकासाकडे बारकाईने लक्ष देतो त्याचबरोबर शाळेच्या समस्या सोडविण्यासाठी पदोपदी सहकार्य देतो शाळा प्रशासन व स्थानिक प्रशासन यांचा समन्वय चांगला असल्यामुळे पंचक्रोशीत ही शाळा नावलौकिक पावलेली आहे.

9] पालकांच्या कसोटीवर उतरलेली शाळा:- आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा चढता आलेख पाहून इतर पाल्यांना याच शाळेत प्रवेश घेण्यासाठी पालक धडपड करतात कारण शाळेतील प्रत्येक शिक्षक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देतात विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेतात विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे वळण शिस्त लावतात त्यामुळे पालकांचा ओढा या शाळेकडे जास्त दिसून येतो.

या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थी पटनोंदणी व उपस्थिती, संपादणूक पर्यायाने वाढत आहे. त्यामुळे शाळा सतत प्रगतीच्या उंच शिखरावर जात असल्याचे दिसून येत आहे.

## तीनही शाळेतील पटनोंदणी व नियमित उपस्थितीमुळे मुलांमध्ये झालेले बदल -

1) भौतिक सुविधा व शैक्षणिक गुणवत्ता असल्याने शाळेत मुलांच्या नियमित उपस्थितीचे व पटनोंदणीचे प्रमाण वाढले.
2) शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण देत असल्याने पट नोंदणी मर्यादेपेक्षा जास्त होऊ लागली.
3) शिष्यवृत्ती पॅटर्नमुळे विद्यार्थी अधिकाधिक शिष्यवृत्तीधारक झाले.
4) नवोदय विद्यालयासाठी अधिक विद्यार्थी पात्र झाले.
5) नवोदय विद्यालयासाठी अधिक विद्यार्थी पात्र झाले.
6) सैनिक स्कूल परीक्षेसाठी अधिक विद्यार्थी पात्र झाले.

7) बाह्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन गणित प्राविण्यमध्ये मुलांचा सहभाग वाढला.
8) विद्यार्थी गणित प्रज्ञाशोध मध्ये सक्रिय झाले.
9) भूगोल प्रज्ञाशोध या परीक्षेमुळे परीक्षेत मुले पात्र झाली.
10) हिंदी सुबोध परीक्षेत मुले पात्र झाली.
11) खान अकॅडमी पोर्टलवर विद्यार्थी जास्त सक्रिय झाले.
12) शैक्षणिक डॉ. होमी बाबा बालवैज्ञानिक परीक्षेत दर वर्षी विद्यार्थी होतात.
13) विद्यार्थ्यांची इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन निवड झाली.
14) विद्यार्थी क्रीडा स्पर्धा बौद्धिक स्पर्धा व इतर उपक्रमात सहभागी होत आहेत.
15) विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त दिसून येत आहे.
16) विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला.
17) शाळेच्या पहिल्याच दिवशी सर्व मुलांना मोफत पाठ्यपुस्तके वह्या व गणवेशाचे वाटप होत असल्याने मुलांमध्ये शाळेविषयी आकर्षण वाढले.
18) मुलांना बचत बँकेमुळे बालपणापासूनच बचतीची सवय लागली.
19) विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत असल्याचे दिसून आले.

आदर्श नोडल अधिकारी , पीएमसी योजना नोडल अधिकारी व संपर्क अधिकारी म्हणून शाळा भेटीची जबाबदारी माझ्याकडे आली. या दरम्यान शाळांना भेटी देणे, प्रशिक्षण, शिक्षण परिषदा, बैठका घेणे ,मुख्याध्यापक शिक्षक व विद्यार्थ्यांचे सुसंवाद साधणे. या गोष्टी करता आल्या.तीनही शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांची नम्रता लक्ष वेधून घेते, कारण या शाळेत सर्व घटक स्वयंप्रेरणेने स्वयंस्पर्तीने कार्य बघून असलेला दिसून आला.ग्रामीण भाग व महानगरपालिका क्षेत्रातील अनेक अडचणींवर मात करत शैक्षणिक गुणवत्ता विकासामध्ये मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळांमध्ये तीनही शाळेने क्रमांक पटकावले आहेत व बक्षिसे मिळवणाऱ्या शाळा कशा पद्धतीने पटनोंदणी व उपस्थिती साधतात हे अभ्यासण्यात नितांत समाधान व आनंद वाटला.

**चला तर.... प्रश्नांवर चिंतनाद्वारे थोडा विचार करूया.....**

1) श्रीमती ठोंबरे, श्री. पाटील व श्री. साळवी यांनी शाळेत घडवून आणलेल्या बदलांची यादी करा.

2) पट नोंदणी व नियमित उपस्थितीचे उद्दिष्ट साध्य करताना कोणत्या नेतृत्व कौशल्याची गरज आहे असे आपणास वाटते.
3) नियमित उपस्थिती आणि विद्यार्थी संपादणूक यांचा एकमेकांशी असलेला संबंध याबाबत आपले मत व्यक्त करा.

**थोडासा विचार थोडीशी चर्चा करूया......**

पट नोंदणी उपस्थितीबाबत कमालीची अनास्था दिसून येते त्यामुळे शाळेचा गुणवत्ता विकास करताना अडचणी येतात अशा शाळेत बदलीने रुजू झाल्यानंतर आपण काय करावे?

**शाळेच्या नेतृत्वाला पटनोंदणी व नियमित उपस्थिती संदर्भात पूर्ततेसाठी असेही करता येईल....**

1) पटनोंदणीसाठी प्रभावी सर्वेक्षण प्रक्रिया राबवता येईल, ज्यात प्रत्येक बालकाची पटनोंदणी केली जाईल.
2) पट नोंदणीसाठी सर्वेक्षण करताना वाडी, वस्ती, तांडे असेही वर्गीकरण करता येईल.

3) पटनोंदणी व उपस्थिती वाढविण्यासाठी नियोजनात्मक मुख्याध्यापक बैठक, शिक्षक बैठक व इयत्ता निहाय बैठक घेता येईल.
4) पालक शाळेत आवर्जून उपस्थित राहतील अशा कार्यक्रमाचे आयोजन करता येईल.
5) पट नोंदणी व नियमित उपस्थिती बाबत शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती ग्रामस्थ आणि पालक यांच्याशी सतत बैठका व गृहभेटीद्वारे संवाद साधता येईल.
6) पट नोंदणी व उपस्थिती वाढविण्यात सिंहाचा वाटा असणाऱ्या शिक्षक व मुख्याध्यापकांचा जाहीर सत्कार करता येईल.
7) पटनोंदणीचे उद्दिष्ट १००% साध्य करण्यासाठी संघ व संघ्नेतृत्वाचा विचार करता येईल.
8) दाखलपात्र मुलांना प्रवेश देण्यासाठी लॉटरी पद्धतीचा वापर करता येईल.
9) पट नोंदणी व उपस्थितीसाठी समाजाची मदत घेता येईल.
10) पटनोंदणी व उपस्थितीसाठी पालक व ग्रामस्थ यांची मदत घेता येईल.
11) पटनोंदणी व उपस्थितीसाठी माता पालक गटांचा सक्रीय सहभाग घेता येईल.
12) पट नोंदणी उपस्थितीसाठी शाळा व समाज यांच्यात सहकार्याचे संबंध प्रस्थापित करता येतील, यांच्यातील समन्वयाची प्रेरणा घेता येईल.
13) दर तीन महिन्यांनी होणाऱ्या शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीत नियमित उपस्थिती बाबत चर्चा करून कृती नियोजन व अंमलबजावणी करता येईल.
14) नियमित उपस्थितीसाठी पालक भेटी व गृह भेटीचे आयोजन करता येईल.
15) नियमित उपस्थितीसाठी शाळेत अनेक प्रभावी उपक्रमांची अंमलबजावणी करता येईल.
16) अपुऱ्या शिक्षक संख्येवर मात करण्यासाठी सुशिक्षित व डीएड अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या स्वयंसेवकाची मदत घेता येईल.
17) शिक्षकांच्या रजेच्या कालावधीत वर्गाध्यापन व वर्ग नियंत्रण करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व माता पालक गटातील सदस्यांची मदत घेता येईल.
18) अपुऱ्या शिक्षक संख्येबाबत प्रशासकीय यंत्रणेला प्रस्ताव पाठवून निदर्शनास आणून देता येईल.
19) वाढत्या पटसंख्येला भौतिक सुविधा पूरविण्यासाठी सीएसआरची मदत घेता येईल
20) वाढत्या पटसंख्येच्या अन्य सुविधांसाठी प्रशासनाची मदत घेता येईल.
21) नियमित उपस्थितीत राखण्यासाठी पालकांचा विश्वास संपादन करता येईल.

**पटनोंदणी व नियमित उपस्थिती संदर्भात शासन निर्णय व परिपत्रके -**

1. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार बालकांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाकडे लक्ष वेधले आहे.
2. शासन निर्णय क्रमांक RTE- 2018/ प्र.क्र 180/ एसडी एक दिनांक 18 /9/ 2020 नुसार सहा ते चौदा वयोगटातील दाखलपात्र बालकांची १००% पटनोंदणी करणेकरिता मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.
3. शासन निर्णय, ११ऑक्टोंबर२०११क्र. पीआरई-२०१०/प्र.क्र.२१२[ बी]/पीई-१ बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम  नुसार राज्यातील विद्यार्थी उपस्थितीबाबत सूचना दिलेल्या आहेत.
4. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार पटनोंदणी व नियमित उपस्थितीबाबत चिंतन करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद ,पुणे.( MPSP) परिपत्रकात महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था ,खाजगी अनुदानित संस्था, अंशतः अनुदानित शाळेतील इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती SWIFT CHAT  या अँपमधील ATTENDANCE BOTवर ऑनलाईन पद्धतीने नियमितपणे नोंदविण्याचा सूचना दिलेल्या आहेत.

5. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय, क्रमांक: समग्र २०२४/प्र क्र ३३/ एसडी-११२ मार्च २०२४ नुसार राज्यात विद्या समिक्षा केंद्र कार्यान्वित करणेबाबत सूचना दिल्या आहेत.
6. शाळा टिकविण्यासाठी पटनोंदणी व नियमित उपस्थिती संदर्भात वरील शासन निर्णय परिपत्रके यांची मदत झाली आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने पटनोंदणी व उपस्थिती संदर्भात केलेला विचारः**

- सन 2030 पर्यंत विविध उपायोजनांच्या माध्यमातून पूर्व प्राथमिक शाळा पासून माध्यमिक शिक्षणापर्यंत १००% पटनोंदणी साध्य करायची आहे.
- शाळेत मुलांच्या प्रवेशा संदर्भात उपाययोजना करून शालेय प्रवेशाची दरी कमी करायचा मानस आहे.
- शाळेत प्रवेश घेतलेल्या मुलांच्या दैनंदिन उपस्थितीचा व अध्ययन निष्पत्तीचा आढावा घेणे तसेच शिक्षक, समाजसेवक व स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत शाळेतून गळती होणाऱ्या व शाळेत न येणाऱ्या मुलांना शाळेत आणण्यासाठी  प्रयत्न केले जातील.
- विद्यार्थ्यांच्या व अशैक्षणिक व शैक्षणिक क्षेत्रातील विकासाला चालना देण्यासाठी तसेच बालकांना व पालकांना संवेदनशील बनवून प्रत्येक विद्यार्थ्याची अद्वितीय क्षमता शोधणे आणि वृद्धिंगत करणे.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चा आढावा घेतला असता विद्यार्थ्यांच्या दृष्टीने शालेय शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्टांपैकी एक तत्त्व म्हणजे सर्व स्तरावरील शिक्षणामध्ये सर्वांना वैश्विक प्रवेश व त्यांना शिक्षण प्रवाहात टिकून ठेवणे सन 2030 पर्यंत 3 ते 18 वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीच्या दर्जेदार शिक्षणात प्रवेश मिळवून शिक्षणामध्ये त्यांचा सहभाग घेणे.
- मुले शाळेमध्ये प्रवेश घेतील व नियमितपणे शाळेत उपस्थित राहतील याची खात्री करणे हे शालेय शिक्षण प्रणालीच्या प्राथमिक उद्दिष्टांपैकी एक असावे .सर्व शिक्षा अभियान (आता समग्र शिक्षा अभियान) आणि शिक्षणाचा अधिकार अधिनियम यासारख्या पुढाकारातून भारताने अलीकडील काळात प्राथमिक शिक्षणामध्ये जवळजवळ सर्व विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देऊन उल्लेखनीय प्रगती करणे.
- पायाभूत टप्पा (फाउंडेशन स्टेज) ते इयत्ता बारावी पर्यंतच्या 18 वर्षे वयोगटातील सर्व मुलांना समान व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी योग्य सुलभन व्यवस्था निर्माण करणे. शाळा ,शाळेचा परिसर यांच्याशी जोडलेले समुपदेशक, प्रशिक्षित समाजसेवक आणि शिक्षक हे नेहमी विद्यार्थी आणि पालक यांच्यासोबत काम करतील व सर्व विद्यार्थी शाळेमध्ये नियमित येत आहेत आणि चांगल्या पद्धतीने अध्ययन करत आहे याची खात्री करणे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये NEP20-20 निर्देशित केलेल्या शिफारशी -**

- ➢ जन्म व कौटुंबिक पार्श्वभूमी यांच्याशी निगडित परिस्थितीमुळे कोणतेही मूल शिक्षणाच्या व प्रगतीच्या एकाही संधीला मुकणार नाही अशी हमी देण्याची शिफारस NEP 2020 करते. मुलांच्या शिक्षणासाठी अनेक नियोजित उपाययोजना अंतर्भूत केल्या आहेत. तसेच विशेष शिक्षण झोन उभारण्याची शिफारस देखील या धोरणामध्ये केली आहे.
- ➢ सर्व स्तरावरील शिक्षणामध्ये सर्वांना वैश्विक प्रवेश मिळावा व त्यांना शिक्षण प्रवाह टिकून ठेवण्यासाठी RTE 2009 या कायद्याचा विस्तार करून शाळा पूर्व ते इयत्ता बारावी पर्यंतचे मोफत व सक्तीचे शिक्षण वय वर्ष तीन ते अठरा उपलब्ध करून देण्याची शिफारस आहे.

**पटनोंदणी व नियमित उपस्थितीत या मॉड्युलची शालेय नेतृत्वाच्या दृष्टिकोनातून भूमिका-**

आरटीई 2009 नुसार बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणातून शाळेत मूल आले पाहिजे, टिकले पाहिजे आणि शिकले पाहिजे यासाठी प्रयत्न करणे आवश्यक ठरले. पट नोंदणीत व उपस्थितीत येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे या

संदर्भात सूक्ष्म नियोजन करून प्रत्येक मानवी घटकावर याबाबतची जबाबदारी निश्चित करणे. पट नोंदणीत व नियमित उपस्थितीत पालक, शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती यांचे सहकार्य घेणे. पट नोंदणी व उपस्थितीचे १००% ध्येय साध्य होईल याकडे लक्ष देणे. दरवर्षी पट नोंदणीच्या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करणे. नियमित उपस्थितीसाठी शाळा स्तरावर नाविन्यपूर्ण कार्यक्रम हाती घेणे गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे. आनंददायी वातावरण निर्मिती करणे. भौतिक सुविधा वाढविणे .पालकांची भूमिका निश्चित करणे. पालकांना विविध शालेय उपक्रमात सहभागी करून घेणे. पालक सभा घेऊन पालकांचे प्रबोधन करणे .त्यांना विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थिती संदर्भात मार्गदर्शन करणे. शिक्षकांना १००% पटनोंदणीसाठी प्रोत्साहन देणे. शाळेसाठी काम करणाऱ्या सर्व पर्यवेक्षीय यंत्रणेला प्रेरणा देणे .शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे. या सर्व अभ्यासातूनच सदर मॉड्युलची निर्मिती झाली, ज्याचा फायदा नक्कीच नेतृत्व विकासाच्या वाटचालीस होईल.

- पटनोंदणीसाठी सूक्ष्म नियोजन करून कुटुंब सर्वेक्षण पार पाडणे.
- पटनोंदणी पंधरवडाची प्रभावी अंमलबजावणी करणे.
- विद्यार्थ्यांची नियमित उपस्थितीसाठी कार्यनिती शाळेतील भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा वाढविण्याकडे लक्ष देणे.

**समारोप-**

शिक्षण क्षेत्रात काम करताना अनेक विपरीत व प्रतिकूल परिस्थितीतून नेतृत्वाला मार्ग काढावा लागतो. विद्यार्थ्यांना शाळेत आणणे, शिकविणे , टिकविणे आणि त्याचबरोबर गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे सामर्थ्य सक्षम नेतृत्वाकडेच असते. शाळेचा नेता म्हणून काम करत असताना शालेय नेतृत्व विकसित होत असते. यात नियोजन, व्यवस्थापन , प्रशासन , स्वयंविकास ,अन्य शालेय घटकांचा विकास , भागीदारी व संघ बांधणी यातील भूमिका व जबाबदारी यांचा समावेश होतो. नेता हा अध्ययन -अध्यापन प्रक्रिया प्रभावी व परिणामकारक होण्यासाठी तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांची अपेक्षा संपादणूक गाठण्यासाठी सहकाऱ्यांना देखील प्रेरणा देतो. आपल्या कार्यक्षेत्रात स्वतःच्या उदाहरणातून शालेय नेतृत्वाचा आदर्श निर्माण करतो. कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील शाळेत पटनोंदणी व नियमित उपस्थितीसाठी काम करणाऱ्या श्रीमती ठोंबरे, श्री.पाटील व श्री गोसावी यांच्यासारखे अनेक मुख्याध्यापक व शिक्षक कोल्हापूर जिल्ह्यात कार्यरत आहेत. या सर्वांच्या अभ्यासातून १००% पट नोंदणी व नियमित उपस्थितीसाठी यशस्वी कार्य होत राहो सदिच्छा.

**संदर्भ साहित्य -**

१] बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९.

2] शासन निर्णय क्रमांक RTE- 2018/ प्र.क्र 180/ एसडी एक दिनांक 18 /9/ 2020 .

३] शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य जानेवारी २०१८ संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे.

४) निष्ठा मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार डिसेंबर २०१९,
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे.

५)राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020

६) मानव संसाधन विकास मंत्रालय, शिक्षण मंत्रालय

७) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 20-20 सारांश

८)निपा व मिपा स्तरावरील मोडुल्स

**Youtube links...**

**अ) श्रीम. लक्ष्मीबाई कृ. जरग विद्यामंदिर. मनपा कोल्हापूर, शाळेतील विविध उपक्रमांच्या लिंक**

**1) https://youtu.be/OMi6zccpO14?si=Pt4cXO9dXOqgZt1N**

**2) https://youtu.be/pyJ_DKTjsIM?si=L8LkwlQhRgw4CNY2**

**3) https://youtu.be/Fl7o54UzhCQ?si=Audxko4QuqMndOsF**

**4) https://youtu.be/n0ltbri733k?si=VXLrfsIWqfWYXaY3**

**5) https://youtu.be/ER0DoQsROIs?si=GCXocpU0s3T8cCq-**

**6) https://youtu.be/ZLtOy6vloR4?si=o7Su4Hw-fKfsctog**

**7) https://youtu.be/htNvuxZ6xN4?si=OlGoK0y_VLdtB_ad**

**8) https://youtu.be/CoGQT3ikFQc?si=qNCbv5RZOWSP7V79**

**9) https://youtu.be/wPQge6ZQsJA?si=LQYP6vlxTMIVJ4BO**

**10) https://youtu.be/uJQaE3ntKl4?si=wWQO8ojucj3O6IuT**

**ब) कुमार विद्यामंदिर नंबर 3 कुरुंदवाड तालुका शिरोळ जिल्हा कोल्हापूर,शाळेतील विविध उपक्रमांच्या लिंक**

1) **https://youtu.be/jY-1vs5KQYs?si=d10JREJsvpn0csnX**

2) **https://youtu.be/jY-1vs5KQYs?si=d10JREJsvpn0csnX**

3) **https://youtu.be/CQ4uOdSpIRY?si=5pHx73fQA9M1Nls4**

4) **https://youtu.be/xjHOVDuUdXk?si=Zt5S55GdOvOk2Bg3**

5) https://youtu.be/AOoOlPXHcoM?si=kgbM7NBeD8ZYNpi9

6) https://youtu.be/iECRKywtZ8c?si=2oH_x27m47yNxnB4

7) https://youtu.be/veypNz1t5UE?si=jwqoU11wzHJFC9Qp

8) https://youtu.be/veypNz1t5UE?si=jwqoU11wzHJFC9Qp

**क) विद्या मंदिर कणेरीवाडी, केंद्र कणेरी तालुका करवीर जिल्हा कोल्हापूर,शाळेतील विविध उपक्रमांच्या लिंक**

1) https://youtu.be/JgyI9Mi1ZDA?si=FuSBngWnvDXuIBe9

2) https://youtu.be/SnDyupymBb0?si=3uZN8Pj4lzP5hbme

3) https://youtu.be/ydYVvHUL5gI

4) https://youtu.be/mLWvjX0ehMw

5) https://youtube.com/@Enjoyfuleducationwithswapnali

6) https://youtu.be/SnDyupymBb0?si=3uZN8Pj4lzP5hbme

7) https://www.facebook.com/share/v/wMCHaGou7JxjkN64/?mibextid=qi2Omg

8) https://www.facebook.com/share/p/i6W6mN8n9SRH5eKa/?mibextid=qi2Omg

9)https://www.facebook.com/share/v/HStHAvkjqbD2nepq/?mibextid=qi2Omg

10) https://www.facebook.com/share/v/SyPwNCPr8NTkUhL8/?mibextid=qi2Omg

11) https://www.facebook.com/share/p/owXXkGpjBMdLCWUr/?mibextid=qi2Omg


**मोड्यूल विकसक**
डॉ.अंजली सतीश रसाळ
**वरिष्ठ अधिव्याख्याता**
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
कोल्हापूर.

**समन्वयन**
डॉ.ज्योती कुलकर्णी
**समन्वयक**
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),
छत्रपती संभाजीनगर

**मार्गदर्शक**
डॉ.वैशाली जामदार
**संचालक**
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),
छत्रपती संभाजीनगर